# पर्यावरण क्रांती परिषदेत शहरातील इको निडस फाऊंडेशनचा सहभाग

सीएनएक्स प्रतिनिधी
cnx@lokmat.com

**औरंगाबाद, दि. २७ - जागतिक स्तरावर वाढत असलेले तापमान आणि प्रदूषण या समस्यांवर प्रकाश टाकण्यासाठी श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथे पर्यावरण क्रांती या दोनदिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत शहरातील इको निडस फाऊंडेशन या संस्थेच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रेमानंद आगळे यांनी परिषदेत मार्गदर्शन केले.**

पर्यावरण मंत्रालय श्रीलंका आणि इको निडस फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १८, १९ ऑगस्ट रोजी दोनदिवसीय इको रिव्होलेशन परिषदेचे आयोजन श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथे करण्यात आले होते. या परिषदेत भारत, कोरिया, क्युबा, नेपाळ, बांगलादेश, मलेशिया, जपान, सिंगापूर, इंडोनेशिया, इटली, चीन, म्यानमार, भुतान या देशांतून पाचशेच्या वर पर्यावरण संशोधकांनी सहभाग घेतला होता. इको निडस फाऊंडेशन ही संस्था शहरात कार्यरत आहे. संस्थेच्या माध्यमातून पर्यावरणाविषयी युवकांमध्ये जनजागृतीचे काम करण्यात येत आहे. संस्थेच्या कार्याची दखल जागतिक स्तरावर घेण्यात आली असून, संस्थेचे अध्यक्ष प्रेमानंद आगळे यांना परिषदेमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी बोलावण्यात आले होते. परिषदेमध्ये जलसंवर्धन, नदी व इकोलॉजी, जैवविविधता, घनकचरा व्यवस्थापन, ऊर्जा, पर्यावरण आदी विषयांवर २०० संशोधकांनी शोधनिबंध सादर केले. समारोपप्रसंगी पर्यावरण परिषदेचा जाहीरनामा सादर करण्यात आला. पृथ्वीवरील ५० टक्के जंगल नष्ट झालेले आहे. त्याचबरोबर ७५ टक्के पिकांच्या जाती विलुप्त होण्याच्या मार्गावर असल्याने वाळवंटासारख्या समस्या निर्माण होत आहे. विकसनशील देशातील नद्यांमध्ये प्रदूषण वाढत असल्याने परिषदेच्या जाहीरनाम्यामध्ये याविषयी चिंता व्यक्त करण्यात आली.




श्रीलंका येथे इको एव्होल्यूशन-२०१२ या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत शहरातील इको-निडस् फाऊंडेशन या संस्थेन सहभाग घेतला. यावेळी मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष प्रेमानंद आगळे.